मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# साहेब जीव गेल्यावर रस्त्यांची दुरुस्ती करणार काय?

## देहू-आळंदी रस्त्यावर खड्ड्यांचे साम्राज्य; वाहतूक कोंडीत भर

**मोशी ।**

**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

रस्त्यांची खोदाई, प्रशासनाचे दुर्लक्ष यामुळे देहू-आळंदी मार्गावरील रस्त्याची चाळण झाली आहे. रस्त्यावर मोठे खड्डे पडले आहेत. खड्ड्यातून वाहनांना सावकाश वाट काढावी लागत आहे. परिणामी या रस्त्यावर वाहतूक कोंडी होत आहे. नागरिकांमधूनही तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

आळंदी देहू जोडणारा रस्ता आळंदी कडून डुडूळगाव फाटा ते सावता माळी मंदिरा पर्यंत जाणार्या रस्त्यावर ठिकठिकाणी खड्ड्यांचे साम्राज्य आहे. अनेक वेळेला या रस्त्यावर रस्त्याची खोदाई केली जाते. पाईपलाईन टाकणे, केबल टाकणे यामुळे रस्त्याची खोदाई होत आहे. ही रस्ते खोदाई करून विकास कामे केल्यानंतर तात्काळ पूर्ववत रस्ता विकिसित करणे गरजेचे आहे. मात्र महापालिका आणि संबंधीत ठेकेदार याकडे जाणीवपुर्वक दुर्लक्ष करीत आहेत. त्यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये नाराजीचा सूर उमटत आहे. रस्त्यावरील खड्ड्यांनी अपघाताची शक्यता असल्याने तात्काळ खड्डे भरण्याची मागणी येथील नागरिक करीत आहेत.

काही ठिकाणी इंद्रायणी कडे जाणार्या वाय जंक्शन रस्त्यावर चेंबरला असलेली झाकणे तुटलेली असतात. परिणामी रात्रीच्या वेळी वाहने चालविताना वाहनधारकांना कसरत करावी लागत आहे. हे रस्ते सुरळीत होणार कधी, असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. श्री संत तुकोबा महाराज, श्री संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या दर्शनासाठी राज्यभरातून वारकरी दाखल होतात. या रस्त्यावर वाहतूकीची रहदारी सातत्याने होत असते. त्यामुळे मोठे खड्डे पडत आहेत. ते दुरूस्त न केल्याने वाहनधारकांची वाहने त्यामध्ये आदळत आहेत. पावसाळ्यात पाणी साचत आहे. परिणामी वाहनधारकांना याचा अंदाज येत नाही. त्यामुळे वाहनांचे अपघात होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.





### नोकरदारांना मानसिक, शारिरीक आणि आर्थिक त्रास

» सकाळी दहा वाजता तर सायंकाळी पाच नंतर या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहतूकीची कोंडी होते. त्यामुळे कामावर जाण्यासाठी आणि कामावरून परत घरी येणार्या नोकरदारांसाठी हा प्रवास जिकिरीचा होत आहे.रस्त्यांवर मोठ्या प्रमाणांत खड्डे पडल्याने वाहने संतगतीने चालवले जात असल्याने वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात होते आहे. खड्ड्यांमुळे शॉकऑब्जर खराब होत आहे. परिणामी गाड्यांच्या दुरुस्तीचे काम निघत आहे. चिखलीतून मोशी किंवा जाधववाडीचे अंतर दहा मिनिंटाचे आहे. मात्र खड्ड्यांमुळे होणाऱ्या कोंडीमुळे एक तास पोहचण्यास लागतो आहे. खड्डे अपघाताला निमंत्रण देत आहेत, प्रशासनाने तत्काळ दखल घेऊन कामकाज करावे अशी संतप्त प्रतिक्रिया व्यावसायिक अमोल निकम यांनी व्यक्त केली.

### तात्पुरते खड्डे बुजबून टिकणार नाहीत

» देहू-आळंदी रस्त्यावरील खड्ड्यांच्या दुरुस्तीबाबत पाणीपुरवठा विभागा सातत्याने सांगण्यात आले होते. या रस्त्याच्या उजव्या बाजूने अजून एक पाण्याची पाईपलाईन जाणार आहे. तात्पुरत्या स्वरूपात खड्डे बूजविण्यासाठी पुन्हा सूचना देऊ. तसेच तात्पुरते खड्डे बुजबून टिकणार नाहीत. त्यामुळे हा रस्ता उखडून पूर्ण नव्याने करावा लागणार आहे. आयुक्तांना या रस्त्यांचे प्रात्यक्षिक सादर कऱणार असल्याची माहिती सहशहर अभियंता प्रमोद ओंभासे यांनी दिली. या रस्त्याची बीबीएम पर्यंत दुरुस्ती केली आहे. मात्र पावसामुळे पुन्हा खड्डे पडले आहेत. याची दखल स्थापत्य विभागाने घेणे आवश्यक आहे असे पाणी पुरवठा विभागाचे सहशहर अभियंता श्रीकांत सवणे यांनी सांगितले.

# गृहप्रकल्पामध्ये सीसीटीव्ही बसविणे बिल्डरची जबाबदारी!

## हाऊसिंग सोसायटी फेडरेशनच्या मागणीला यश

**मोशी।**

**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

प्रत्येक गृहप्रकल्पामध्ये सीसीटीव्ही बसविणे बांधकाम व्यावसायिकांवर आता बंधनकारक आहे. पिंपरी चिंचवड महापालिकेचे आयुक्त शेखरसिंह यांनी याबाबतचे आदेश काढले आहेत. या मागणीसाठी चिखली-मोशी -पिंपरी चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशनने पुढाकार घेतला होता. आमदार महेश लांडगे व आयुक्तांमध्ये नुकतीच यासंदर्भात बैठक झाली होती. त्यानुसार आयुक्तांनी या मागणीला हिरवा कंदील दाखवला आहे. बांधकाम व्यावसायिकांनी बांधकाम पूर्णत्वाचे दाखले घेताना, जोपर्यंत भामा आसखेडचा टप्पा क्रमांक पाच आणि सहा पूर्ण होऊन पिंपरी चिंचवड महापालिका पूर्ण क्षमतेने पाणी पुरवत नाही, तोपर्यंत विकसक स्वखर्चाने पाणी पुरवतील. तसेच इंटरकॉम सुविधाही त्यांनीच उपलब्ध करून दिली पाहिजे, असेही



आयुक्तांनी नमूद केले आहे. फेडरेशनच्या मागण्यांना आयुक्तांनी हिरवा कंदील दाखविल्यामुळे आता सोसायटीचा पाणीप्रश्न आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने सीसीटीव्ही कॅमेरे देखील बसविण्यात येणार आहेत. विकासकांनी याचे उल्लंघन केल्यास त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्याचा इशारा देण्यात आला आहे. सदनिकाधारकांच्या संमतीशिवाय सतत केला जाणारा बांधकाम आराखड्यातील बदल, सोसायटीच्या साईड मार्जिनमध्ये विकासक देत असलेल्या ओपन पार्किंग त्यामुळे सोसायटीमध्ये ॲम्बुलन्स, फायर ब्रिगेडची गाडी फिरत नाही, पिंपरी चिंचवड शहरातील बांधकाम व्यवसायिकांनी पिंपरी चिंचवड महापालिकेमध्ये सादर केलेल्या बांधकाम आराखड्याप्रमाणे पूर्ण गृहप्रकल्पाचे काम पूर्ण झाल्याशिवाय भाग पूर्णत्वाचे (पार्ट कंम्प्लिशन) दाखले देण्यात येऊ नयेत, अशा अनेक समस्यांबाबत बैठकीमध्ये चर्चा झाली होती.

> **“सोसायटी धारकांच्या सुरक्षिततेबाबत अत्यंत महत्त्वाचा असणारा प्रत्येक गृहप्रकल्पामध्ये सीसीटीव्ही यंत्रणा तसेच इंटरकॉम यंत्रणा बसवण्याचे आदेश आयुक्त शेखरसिंह यांनी बांधकाम व्यावसायिकांना दिले आहेत. त्याबद्दल त्यांचे व आमदार महेश लांडगे यांचे फेडरेशनतर्फे आभार.**
>
> **-संजीवन सांगळे, अध्यक्ष, चिखली - मोशी - पिंपरी चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशन**

# कंत्राटी भरती विरोधात राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस आक्रमक ; राज्यव्यापी आंदोलन

## छत्रपती संभाजीनगर येथून आंदोलनाला सुरुवात

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।** राज्य शासनाच्या कंत्राटी भरती विरोधात राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसने आक्रमक भूमिका घेतली आहे. राज्यव्यापी आंदोलन करण्यात येणार आहे. उद्या छत्रपती संभाजीनगर येथून आंदोलनाला सुरुवात होणार असून सरकारी नोकरी वाचवण्यासाठी तरुणांनी आंदोलनात सहभागी व्हावे असे आवाहन राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील गव्हाणे यांनी सांगितले. महाराष्ट्र सरकारने नुकताच राज्य शासनातील कर्मचारी कंत्राटी पद्धतीने भरण्याचा आदेश काढला आहे. यासाठी नऊ कंपन्यांना पाच वर्षांसाठी कंत्राट देण्यात आले आहे. या कंपन्या सरकारमधील काही आमदारांच्या आणि त्यांच्या जवळच्या लोकांच्या असल्याचा आरोप होत असतानाच आता या आदेशाला संपूर्ण राज्यातील विद्यार्थ्यांकडून विरोध होताना दिसत आहे. यात आता राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसने देखील पुढाकार घेत राज्यभर या निर्णयाच्या विरोधात निषेध आंदोलन करण्याचे जाहीर केले आहे. या आंदोलनाची सुरुवात उद्या छत्रपती संभाजीनगर येथील महात्मा फुले स्मारक, औरंगपुरा येथुन होणार आहे. या आंदोलनात राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस बरोबरच राष्ट्रीय काँग्रेस पक्षाची विद्यार्थी आघाडी एनएसयुआय तसेच इतर संघटना देखील सहभागी होणार आहेत. या आंदोलनाची माहिती देताना राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील गव्हाणे यांनी सांगितले की विद्यमान भाजप प्रणित सरकार हे कंत्राटी सरकार असून लोक प्रतिनिधींपासून कर्मचारी ते शासकीय संस्था आणि शासकीय उपक्रम या सगळ्यांमध्ये कंत्राटी भरती सुरु आहे. मात्र राज्यातील तरुणांच्या भवितव्यासोबत सरकारला आम्ही खेळू देणार नाही. शासकीय नोकरी हा तरुणांचा हक्क आहे, तो त्यांना मिळालाच पाहिजे. यासाठी राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात असंख्य विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत कंत्राटी भरती विरोधात आंदोलन करणार आहे. तरीही सरकारने कंत्राटी भरतीचा निर्णय मागे घेतला नाही तर मुंबई येथे उग्र आंदोलन आम्ही करणार आहोत.



### शासकीय नोकरी हा तरुणांचा हक्क

» आंदोलनाची माहिती देताना राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील गव्हाणे यांनी सांगितले की विद्यमान भाजप प्रणित सरकार हे कंत्राटी सरकार असून लोक प्रतिनिधींपासून कर्मचारी ते शासकीय संस्था आणि शासकीय उपक्रम या सगळ्यांमध्ये कंत्राटी भरती सुरु आहे. मात्र राज्यातील तरुणांच्या भवितव्यासोबत सरकारला आम्ही खेळू देणार नाही. शासकीय नोकरी हा तरुणांचा हक्क आहे, तो त्यांना मिळालाच पाहिजे.

# जाधववाडीमध्ये बांधकाम व्यावसायिकाची मुजोरी!

## सोसायटीधारकांचा जीव धोक्यात : महापालिका प्रशासनाचे होतेय दुर्लक्ष

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।** जाधववाडी मध्ये विठ्ठल एम्पायप फेज-२ सहकारी गृहरचनेचे काम मागील पाच वर्षांपूर्वी पूर्ण् झाले. मात्र बंदावस्थेतील लिफ्ट, पाण्याची गैरसोय, संरक्षक भिंत नाही,रस्त्याची समस्या, पार्किंग समस्या, गार्डन विकसित केलेले नाही. अशा एक नाही अनेक समस्या या गृहप्रकल्पाला असल्याने सदरच्या रहिवाशांनी महापालिका प्रवेशद्वारासमोर आक्रोश करत आंदोलन केले. चिखली-मोशी-चऱ्होली हौसिंग फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे यांच्या पुढाकारातून हे आंदोलन घेण्यात आले. संतोष शिंदे रहिवाशी आम्ही स्मार्ट सिटीत राहतो. मात्र चांगला रस्ता नाही. पुरेसे नाही, संरक्षक भिंत नाही अशा एक ना अनेक समस्याने हैराण झालेले होते. ७२ फ्लॅटची सोसायटी आहे. २०१८ मध्ये पझेशन घेतले होते. अजून सोसायटी रजिस्टर नाही, पूणर्त्वाचा दाखला नाही. या समस्या मार्गी लावण्यासाठी पालिकेच्या प्रवेशद्वारासमोर आंदोलन केले. यावर बांधकाम विभागाचे अधिकारी शहर अभियंता मकरंद निकम यांच्या उपस्थितीत बैठक घेण्यात आली. यावेळी बांधकाम व्यावसायिकांनी हे काम पूर्ण करून देण्यासाठी एक महिन्याची मुदत मागितली आहे. २०१७ च्या आराखड्यनुसार कुठल्याही सुविधा दिलेल्या नाहीत. त्या देण्यासाठी आम्ही फेडरेशची मदत घेतली. निलेश जाधव- आम्ही रहायला आल्यापासून मागणी केली. किमान दोनशे वेळा बांधकाम व्यावसायिकां कडे चकरा मारल्या आहेत. लिफ्ट निकृष्ठ दर्जाच्या, इमारतीच्या मागील बाजूस गटार आहे. तिथेच पाण्याचे बोर, संरक्षक भिंत नाही. फ्लॅट फुकट घेतलेले नाहीत. फ्लॅन दाखवला वेगळाच त्यानुसार सोयीसुविधा दिलेल्या नाहीत. या समस्यांबाबत बांधकाम व्यावसियाकाशी बोलल्यास उपहासात्मक बोलत होता. संजीवन सांगळे म्हणाले, विठ्ठल एम्पायर फेज टू मधील नागरिकांनी समस्यां सोडवण्यासाठी फेडरेशनकडे मागणी केली. या रहिवाशांना फ्लॅननुसार सर्व सुविधा मिळाव्यात यासाठी फेडरेशन आणि रहिवाशांनी महा पालिकेच्या प्रवेशद्वारासमोर आंदोलन केले. बांधकाम व्यावसायिकाने एका महिन्याचा कालावधी काम पूर्ण करण्यासाठी मागितला आहे. दिलेल्या कालावधीत काम पूर्ण न केल्यास उपोषण करू असा इशारा सांगळे यांनी दिला.



# आयटी नगरीतील नाइट लाइफचा धसका!

## आयटीनगरी वाढलेल्या अवैध धंद्यांमुळे होत आहे बदनाम

**पुणे।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
आयटीनगरी हिंजवडी अलीकडच्या काळात वाढलेल्या अवैध धंद्यांमुळे बदनाम होत आहे. चहूबाजूंनी असलेल्या रूफटॉप बारचा दणदणाट अन् हुल्लडबाजांमुळे मध्यरात्रीची शांतता भंग पावत आहे. अनेक वर्षांपासून एकाचजागी ठाण मांडलेले हिंजवडी पोलिस ठाण्यातील व वाकड एसीपी कार्यालयातील पोलिस अवैध धंद्यांना हद्दपार करण्याऐवजी अभय देत असल्याचा आरोप होत आहे. त्यामुळे 'आयटी'तील नाइट लाइफला ब्रेक लागणार कधी, असा प्रश्न सर्व सामान्यांना पडत आहे. 'आयटी'तील रस्ते मध्यरात्री बारानंतर झिंगाट झालेल्या तरुण-तरुणींच्या गर्दीने फुलतात. अद्याप 'आयटी' पूर्ण क्षमतेने सुरु नसताना मद्यपींचे अड्डे मात्र गर्दीने ओसंडून वाहतात. म्हाळुंगेतील व्हीटीपी व गोदरेज लेबर कॅम्प म्हणजे पोलिसांचे राखीव कुरण आहे. हद्दीच्या लांब टोकाला असल्याने येथे कोणाचे सहज लक्ष जात नाही. हॉटेल रॅडिसनमागे, लेबर कॅम्प व हिंजवडी गायरानात अनेक अवैध धंदे सुरू आहेत.

हिंजवडी ठाण्यापासून हाकेच्या अंतरावर काही बार मध्यरात्री उशिरापर्यंत तर काही बार लपून-छापून



२४ तास सुरू असतात. ठाण्याच्या मागील गल्लीत रात्रभर मद्यपींची झुंड येते असते. हॉटेल समोरून बंद दिसल्यास इतरही मार्ग उपलब्ध असतो. पबमुळे रहिवाशांची शांतता भंग पावत आहे. मोठ्याने डीजेचा आवाज धांगडधिंगा अन आरडा-ओरड यामुळे आजूबाजूला राहणारे रहिवासी हैराण झाले आहेत. तक्रारी करूनही काही उपयोग होत नाही. पबमध्ये धांगडधिंगा एकवेळ ठीक आहे पण ते बंद झाल्यावरसुद्धा मद्यधुंद तरुण-तरुणी रस्त्यावर राडा करतात. शुक्रवार ते रविवारपर्यंत हा त्रास नित्याचा झाला आहे. तत्कालीन पोलिस

> 'पब'मधील आवाजासंदर्भात नियमावली असते; मात्र कोणत्या हॉटेलच्या मोठ्या आवाजाचा रहिवाशांना त्रास होत असेल अन् तशी तक्रार असेल तर लगेच कारवाई केली जाईल, तसेच हिंजवडी हद्दीतील अशा सर्व रूफटॉप बारची तपासणी करून त्यांना समज दिली जाईल.
>
> **- डॉ. काकासाहेब डोळे,**
> **पोलिस उपायुक्त**

आयुक्त कृष्ण प्रकाश यांनी अवैध धंदे रोखण्यासाठी सामाजिक सुरक्षा पथकाची स्थापना केली होती. त्याच धर्तीवर हिंजवडीतही तथाकथित सामाजिक सुरक्षा पथक कार्यरत असून, हे पथक म्हणजे केवळ 'गोळा-बेरीज' करण्यासाठी असल्याची चर्चा आहे. या पथकातील अधिकारी, कर्मचारी नाममात्र देशी मद्य विक्रेत्यांवर कारवाईचा बडगा उगारतात. कारवाईचा फार्स करून कर्तव्यदक्ष असल्याचे आयुक्तालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांना भासवतात. प्रत्यक्षात मात्र महिन्याकाठी मलिदा देणाऱ्या मोठाल्या बारचालकांना अभय दिले जाते.

# तरुण कैद्यांचे नेमके दुखणे काय?

## कारागृहातील नऊ जणांवर महिनोंमहिने उपचार

**पुणे।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
येरवडा मध्यवर्ती कारागृहातील नऊ कैद्यांवर महिनोंमहिने ससून रुग्णालयात उपचार सुरू आहेत. काही कैदी दहा-पंधरा दिवस कारागृहात जातात आणि पुन्हा प्रकृती अस्वस्थ झाल्याने रुग्णालयात दाखल होतात. तरुण ते मध्यम वयातील कैद्यांचे नेमके दुखणे काय? याचे निदान करण्यात ससून रुग्णालयातील डॉक्टरांना वेळ का लागत आहे, असा प्रश्न पुढे येत आहे. ससून रुग्णालयाच्या परिसरात सुमारे दोन कोटी रुपयांच्या ड्रग्जच्या व्यवहारातील आरोपी ललित पाटील याने रुग्णालयातून सोमवारी (ता. २) रात्री पळ काढला. पोलिस आणि रुग्णालय प्रशासन रात्री उशिरापर्यंत त्याची शोधाशोध करत होते. या पार्श्वभूमीवर ससूनमध्ये उपचारासाठी दाखल कैद्यांची माहिती 'सकाळ'ला विश्वसनीय सूत्रांनी दिली. तरुण कैद्यांचे




नेमके दुखणे काय? त्यावरून हा प्रश्न आता पुढे येत आहे. पाटील याचे वय ३४ वर्षे आहे. त्याला सहा जून २०२३ रोजी दुपारी अडीच वाजता रुग्णालयात दाखल केले. डॉ. एस. एस. ठाकूर यांचे युनिट त्याच्यावर उपचार करत होते. पाटील याला क्षयरोग झाल्याचे निदान झाले आहे. तसेच, त्याला हार्नियादेखील होता. त्याच्या उपचारासाठी पाटील सहा जूनपासून रुग्णालयात दाखल असल्याची माहिती पुढे आली. याबाबत बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. संजीव ठाकूर यांच्याशी रात्री संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता, त्यांनी प्रतिसाद दिला नाही. पाटील याच्यासह आणखी आठ कैद्यांवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. त्यातील काही कैदी ऑगस्टपासून रुग्णालयात आहेत. नेमक्या कोणत्या आजाराच्या उपचारासाठी त्यांना दाखल केले आहे, निदान काय आहे, एवढे दिवस उपचार का लांबला? असे प्रश्न पुढे येत आहेत. उपचारासाठी ससून रुग्णालयात दाखल झालेल्यांमध्ये फक्त एकाच रुग्णाचे वय ७२ वर्षे आहे. उर्वरित सर्व रुग्ण ३४ ते ४१ वर्षे वयोगटातील असल्याची माहिती मिळाली. स सून रुग्णालयात उपचार घेत असलेला आरोपी ललित अनिल पाटील (वय ३४) याने पोलिसांना चकवा देऊन पलायन केले. ही घटना सोमवारी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास घडली. पाटील याला सोमवारी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास एक्स रे काढण्यासाठी नेण्यात येत होते. त्यावेळी पोलिसांना चकवा देऊन त्याने पलायन केले. या संदर्भात पोलिस आयुक्त रितेश कुमार म्हणाले, ''या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात येत आहे. आरोपीला लवकरच अटक करण्यात येईल.'' अमली पदार्थ बाळगल्याच्या गुन्ह्यात ललित पाटील येरवडा कारागृहात शिक्षा भोगत असताना त्याला उपचारासाठी ससून रुग्णालयातील वॉड क्रमांक १६ मध्ये ४ जून रोजी दाखल केले होते. परंतु ललित पाटील हा रुग्णालयाच्या कॅन्टीनमधील कामगार रौफ रहीम शेख आणि सुभाष जानकी मंडल या दोघांच्या मदतीने मेफेड्रॉन अमली पदार्थ विक्री करीत होता. त्यांच्या ताब्यातून दोन कोटींचे मेफेड्रॉन जप्त केले होते.

# 'भोसरी' स्टेशनचं नाव बदला : महामेट्रो

**पुणे।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
पुण्यात मेट्रो रेल्वेला नागरिकांनी उदंड प्रतिसाद दिला असून प्रवाशांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे. पण पिंपरी-चिंचवड मुख्यालय ते शिवाजीनगर कोर्ट या मार्गावरील भोसरी स्टेशनवरुन प्रवाशांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. त्यामुळं या मेट्रो स्टेशनचं नाव बदलण्यात यावं अशी मागणी महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडनं (महामेट्रो) केंद्रीय गृहनिर्माण आणि नागरी व्यवहार मंत्रालयाकडं केली आहे. पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरांमधून जाणारे मेट्रो मार्ग गेल्या एक ते दीड वर्षात दोन टप्प्यात सुरु झाले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या दोन्ही मार्गांची उद्घाटनं झाली. यांपैकी येत्या मार्च महिन्यात पिंपरी ते फुगेवाडी या मार्गावरील मार्गाचं मोदींच्या हस्ते उद्घाटन झालं. पण आता प्रवाशी संघटनेनं या मार्गावरील भोसरी स्टेशनचं नाव बदलण्याची मागणी केली आहे. भोसरी स्टेशनचं नाव बदलण्याची मागणी केली जात आहे. भोसरी ऐवजी या स्टेशनचं नाव नाशिक फाटा असं करण्यात यावं, अशी मागणी करण्यात आली आहे. कारण या स्टेशनला भोसरी नाव दिल्यानं प्रवाशांमध्ये गोंधळ निर्माण झाला आहे. हे स्टेशन ज्या ठिकाणी स्थित आहे त्या भागाला नाशिक फाटा नावानं ओळखलं जातं तर भोसरी या ठिकाणाहून पाच किमी दूर आहे. सध्याचं स्टेशन आणि नाशिक फाटा ही ठिकाणी पुणे-मुंबई हायवेवर येतात. तर भोसरी हे ठिकाण पुणे-नाशिक हायवेवर येतं. महामेट्रोनं सांगितलं की, कंपनीनं केंद्रीय मंत्रालयाकडं भोसरी हे नाव बदलण्याची मागणी केली आहे. त्याचबरोबर इतरही काही स्टेशनची नाव बदलण्याची मागणी केली आहे. ज्यामध्ये बुधवार पेठ या स्टेशनचाही समावेश आहे.

# पुणे मेट्रोत ‘टाईमपास’ बंद!

## स्थानकात प्रवेश केल्यानंतर २० मिनिटांत प्रवास सुरू करणे बंधनकारक

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** पुणे मेट्रोच्या प्रवासी संख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे. त्याचवेळी केवळ वेळ घालवण्यासाठी मेट्रो स्थानकात येणाऱ्यांची संख्याही वाढली आहे. अनेक जण तिकीट काढून स्थानकात गेल्यानंतर आतमध्ये निवांत बसतात. त्यामुळे दैनंदिन प्रवाशांची विनाकारण गैरसोय होते. यावर उपाय म्हणून महामेट्रोने आता प्रवाशांसाठी तिकीट काढून स्थानकात प्रवेश केल्यानंतर २० मिनिटांत प्रवास सुरू करणे बंधनकारक करण्याचे



पाऊल उचलले आहे. पुणे मेट्रोची सेवा सध्या वनाझ ते रुबी हॉल आणि पिंपरी-चिंचवड महापालिका ते जिल्हा न्यायालय या दोन मार्गावर सुरू आहे. सध्या मेट्रोने दररोज सुमारे ६० ते ६५ हजार प्रवासी प्रवास करतात. मेट्रोची दैनंदिन प्रवासी संख्या सातत्याने वाढताना दिसत आहे. याचवेळी मेट्रो स्थानकात वेळ घालवण्यासाठी येणाऱ्यांची संख्या मागील काही दिवसांत वाढली आहे. अनेक जण तिकीट काढून स्थानकात प्रवेश करतात मात्र, प्रवास सुरू करीत नाहीत. ते एकमेकांशी गप्पा मारत बसतात. याचवेळी काही जण स्थानकाच्या आवारात बैठका घेत असल्याचे प्रकारही समोर आले होते. स्थानकात वेळ घालवण्यासाठी जमलेल्या या प्रवाशांचा त्रास इतर दैनंदिन प्रवाशांना होऊ लागला आहे. कारण स्थानकात कायम गर्दी होताना दिसते. यावर उपाय म्हणून महामेट्रोने तिकीट काढून स्थानकात प्रवेश केल्यानंतर २० मिनिटांत प्रवास सुरू करण्याचा नियमाची अंमलबजावणी सुरू केली आहे. याचबरोबर तिकीट काढून स्थानकात प्रवेश केल्यानंतर प्रवास संपवून प्रवाशाने ९० मिनिटांत बाहेर पडणे आवश्यक आहे. या नियमाचीही महामेट्रोने अंमलबजावणी सुरू केली आहे.

> **“मेट्रोने प्रवास करताना प्रवाशांनी स्थानकात विनाकारण रेंगाळत बसू नये. त्यामुळे स्थानकात गर्दी होऊन त्याचा इतर प्रवाशांना त्रास होत आहे. यावर उपाय म्हणून महामेट्रोने प्रवासाच्या वेळेच्या नियमाची अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेतला आहे. देशातील इतर मेट्रोमध्येही असाच नियम आहे.**
>
> **– हेमंत सोनावणे,**
> **कार्यकारी संचालक, महामेट्रो**

# पुणे, मुंबईसह राज्यात आज मुसळधार पावसाचा इशारा!

## पुढील २४ तासांत अनेक जिल्ह्यांमध्ये मुसळधार

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** मान्सूनच्या परतीच्या प्रवासाला आता सुरुवात झाली आहे. मात्र, अद्याप राज्यामध्ये पावसाचा जोर कायम आहे. वास्तविक खंडानंतर आलेल्या पावसाने सर्वदूर हजेरी लावल्याने अनेकांना दिलासा मिळाला आहे. आगामी २४ तासांमध्ये देखील राज्यात मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. तर कोकण किनारपट्टी भागात मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. या भागातील नागरिकांना सतर्कतेचा इशाराही हवामान विभागाने दिला आहे. बंगालचा उपसागर आणि अरबी समुद्रात कमी दाबाचे



### सिंधुदुर्ग जिल्ह्यात रेड अलर्ट

**» हवामान विभागाच्या वतीने सिंधुदुर्ग जिल्ह्यात रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. येथे पावसासोबत वाऱ्याचा वेग वाढण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. त्यामुळे प्रशासन ॲक्शन मोडमध्ये आले असून सर्व उपाय योजना करण्यात आल्या आहेत. नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहनही प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे. येथे ५ ऑक्टोबरनंतर आकाश अंशतः ढगाळ राहून हवामान कोरडे राहील. त्यामुळे, पावसाची शक्यता कमी असणार आहे असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.**

क्षेत्र निर्माण झाल्यामुळे राज्यात मोठ्या प्रमाणात पावसाची शक्यता वर्तवण्यात येत आहे. राज्यात पुढील २४ तासांत अनेक जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागाच्या वतीने देण्यात आला आहे. पुढील २४ तासांत ठाणे, मुंबई, उपनगरसह राज्यात मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. राज्यातील काही भागांमध्ये ढगाळ वातावरण दिसून येईल, असाही अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. पुणे, मुंबईसह राज्यात परतीच्या पावसाचा जोरदार मारा होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. पुढील ४८ तास या विभागात अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे. पुढील २४ तासांत अतिवृष्टीची शक्यता आहे. कोकण आणि मध्य महाराष्ट्रात मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे.

# डीजेच्या लेझर लाईटने तरुणाच्या डोळ्याची दृष्टी अधू

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** गणेश विसर्जन मिरवणुकीदरम्यान डीजे आणि लेझर लाईट्सचा वापर मोठ्या प्रमाणात करण्यात आला. या लेझर लाईटमुळे जनता वसाहत परिसरात राहणाऱ्या एका तरुणाच्या डोळ्याच्या रेटिनाला गंभीर इजा होऊन त्याच्या काही अंशी अंधत्व आले आहे, अशी माहिती दूधभाते नेत्रालयाचे नेत्ररोग तज्ञ डॉ. अनिल दूधभाते यांनी मंगळवारी पत्रकार परिषद दिली. अनिकेत (वय २३ रा. जनता वसाहत) असे दृष्टीने अधू झालेल्या या तरुणाचे नाव आहे. अनिकेत मिरवणुकीच्या दिवशी पर्वती पायथा येथे गणेश विसर्जन मिरवणुकीत सहभागी झाला होता. नाचत असताना डिजेवरील हिरवा लेजर लाईट त्याच्या एका डोळ्यावर पडला. यावेळी त्याला डोळ्याला काही वेदना किंवा आग झाली नाही परंतु, त्याची दृष्टी मात्र अंधुक झाली. त्याच्या एका डोळ्याची दृष्टी जवळपास ३० टक्क्याने कमी झाल्याचे अनिकेत ने सांगितले.

यानंतर अनिकेत सिंहगड रस्त्यावरील दूधभाते नेत्रालयात गेला. येथे त्याला नेत्ररोगतज्ञ डॉ. अनिल दूधभाते यांनी उपचार केले. याबाबत अधिक माहिती देताना डॉ. दूधभाते म्हणाले की अनिकेतच्या डोळ्यावर लेजर लाईट पडल्याने त्याच्या नेत्रपटलावर रेटिना वर बर्न झाले आहे. आता त्याच्यावर उपचार सुरू असून तो बरा होत आहे असे डॉ. दूधभाते यांनी स्पष्ट केले.